# चौथी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१५

उमेदवाराचे नाव ________________________________ वय ____________

पत्ता ________________________________________________________

परीक्षा केंद्र ___________________________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ___________________________________________

परीक्षा संचालकाची सही ______________________ तारीख ____________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | लेखी गुण | एकूण गुण (निम्मे गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता गाणी | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

एकूण गुण

| |
|---|
| / १०० |

प्रश्न १

अ) खालील अंक आणि शब्द वाचा. शब्दात/अंकात संख्या लिहा. ६

१. ५४५९
२. ९९८३
३. ३८६०
४. तीन हजार दोन
५. पाच हजार
६. सात हजार पाचशे पंच्याण्णव

ब) खालील शब्द गणिते सोडवा व पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. ४

१) एका गावात ५६० घरे आहेत, प्रत्येक घरात ४ माणसे राहतात. तर त्या गावाची लोकसंख्या किती असेल?

२) एका कंपनीत दिवाळी साजरी करण्यासाठी ९८५० लाडू आणले, त्यातील ६०१५ लाडू संपले तर किती लाडू उरले?

प्रश्न २

कंसातील योग्य शब्द निवडून गाळलेल्या जागी लिहा. १०

१) पृथ्वीला स्वतःभोवती एक पूर्ण फेरी करण्यास ________ वेळ लागतो. (एक आठवडा, २४ तास, एक महिना)

२) मनुष्य, प्राणी व वनस्पती हे _________ आहेत. (सजीव, पुतळे, निर्जीव )

३) महाराष्ट्र राज्य भारताच्या __________ भागात आहे. (पूर्व, पश्चिम, उत्तर )

४) पृथ्वीवरील खाऱ्या पाण्याच्या विशाल साठ्यास ___________ म्हणतात. (बेट, नदी, महासागर)

५) ताजमहाल हा ___________ ह्या नदीच्या काठावर आहे. (यमुना, कावेरी, कृष्णा)

६) भारताची राष्ट्रभाषा __________ आहे. (पंजाबी, मराठी, हिन्दी)

७) _________ मार्गाने केलेली वाहतूक सर्वात कमी वेळात होते. ( हवाई, जल, लोह)

८) सूर्यमालेतील सर्वात मोठा ग्रह __________ हा आहे. ( गुरु, मंगळ, शनी )

९) सर्व महासागर मिळून पृथ्वीचा________ टक्के भाग पाण्याने भरलेला आहे. ( ९७, ७०, २० )

१०) महाराष्ट्राची राजधानी ___________ आहे. ( मुंबई, नागपूर, सिमला )

प्रश्न ३) खालील संवाद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

केदारः– सर, तो पहा सिंह केवढ्याने ओरडतो आहे!

शिक्षकः– सिंहाच्या ओरडण्याला 'गर्जना' म्हणतात.

निमाः– हा पहा उंट, ह्याच्या पाठीवर दोन उंचवटे आहेत.

शिक्षकः– त्यांना 'मदार' म्हणतात. उंट पोटात पाणी साठवतो व वाळवंटातून प्रवास करतांना ते वापरतो.

लिलाः– म्हणून उंटाला 'वाळवंटाचे जहाज' म्हणतात.

केदारः– ही हरणं, ससे, हत्ती, गाई, म्हशी, घोडे हे सर्व शाकाहारी प्राणी आहेत.

विवानः– होय, अरे तो पहा मोर. त्याने आपला पिसारा किती सुंदर फुलवला आहे.

लिलाः– विवान तुला माहीत आहे का भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर आहे ते?

१) शाकाहारी प्राणी कोणते?

------------------------------------

------------------------------

------------------------------------

-------------------------------

२) सिंहाच्या ओरडण्याला काय म्हणतात?

------------------------------------

------------------------------

------------------------------------

-------------------------------

३) भारताचा राष्ट्रीय पक्षी कोणता?

------------------------------------

-------------------------------

------------------------------------

-------------------------------

४) उंट पाणी कशात साठवतो?

-------------------------------------

----------------------------------

-------------------------------------

----------------------------------

५) हा संवाद कुठे घडला असावा ते लिहा.

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

प्रश्न ४

अ) खालील कोणत्याही <u>एका विषयावर</u> ५-६ वाक्ये लिहा. ५

१. वाढदिवसाचे आमंत्रण

२. मला फोन हवा

प्रश्न ४

ब) खालील अक्षरांची फोड केली आहे. पूर्ण शब्द लिहा ५

उदा. -- मे+ (ट्+रो)= मेट्रो

१) (म्+ऋ)+णा+ल =

२) मु+(ख्+य) =

३) सं+पू+(र्+ण) =

४) द+स+(र्+या)+ला =

५) (ब्+र)+(ह्+म)+दे+श =

प्रश्न ५

अ) कंसातील योग्य ते अव्यय वापरून वाक्य पूर्ण करा. ५

(आणि, अहाहा!, किंवा, जवळ, नंतर)

१. ___________ किती सुंदर हे इंद्रधनुष्य.

२. जून _________ जूलै हा महीना येतो.

३. मायकल जॅक्सन स्टेजवर आला _________सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

४. सायली __________ सीमा यांच्यापैकी कोणीतरी नाचाच्या स्पर्धेत पहिली येणार.

५. माझी शाळा माझ्या घरा ________आहे.

ब) खाली नामे व विशेषणे दिली आहेत, त्यांच्या योग्य जोड्या लावा. ५

| | |
|---|---|
| १. फुलपाखरू | पांढराशुभ्र |
| २. शंभर मजली इमारत | रंगीबेरंगी |
| ३. आकाश | सुगंध |
| ४. गुलाब | निळे |
| ५. बर्फ | ऊंच |

प्रश्न ६ ५

अ) खालील चित्रावरून पाच ते सहा वाक्ये तयार करा व लिहा.



प्रश्न ६

ब) खालील वाक्ये वाचून कंसातील योग्य शब्दाला गोल करा. ५

१) मकर संक्रांतीचा सण (सप्टेंबर, जानेवारी) ह्या महिन्यात येतो.

२) भारताच्या राष्ट्रध्वजामध्ये (सुदर्शनचक्र, अशोकचक्र) आहे.

३) महाभारतातील युद्धात ( श्रीकृष्णाने, भीमाने ) अर्जुनाला गीता सांगीतली.

४) सावरकरांना ( महात्मा, वीर) सावरकर असे म्हणतात.

५) (रामदासांनी, ज्ञानेश्वरांनी ) दासबोध हा ग्रंथ लिहिला.

प्रश्न ७. २.५

अ) खालील वाक्यातील काळ ओळखा व कंसात लिहा.
(वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ)

१) उद्या आर्यन न्यू जर्सीला जाणार आहे. (-----------)
२) काल संध्याकाळी आम्ही "बॉयहूड" हा सिनेमा पाहिला. (-------)
३) ती बघ, समोरून बस येत आहे. (---------------)
४) त्याला पाण्याची भिती वाटायची. (---------------)
५) जून मध्ये माझी मराठीची परीक्षा असेल.(------------)

ब ) कंसातील योग्य शब्द निवडून विरूद्ध अर्थाचे शब्द लिहा. २.५
(मित्र, उत्तर, नवे, हळू, डावा )

उदा:- अंधार x प्रकाश

१) मोठ्याने x -----------.
२) प्रश्न x -----------.
३) शत्रू x -----------.
४) उजवा x -----------.
५) जुने x -----------.

क ) खालील चित्रात काही अन्नपदार्थ दिलेले आहेत. ५

ते कोणत्या पौष्टिक अन्नघटकात येतात ते गाळलेल्या जागी लिहा.




१) _________ व __________ यांना
पिष्टमय पदार्थ म्हणतात. (Carbohydrates)

२) ____________आणि _________ यांत
प्रथिने असतात. (Proteins)

३) _________ , ________व _________ यांत
जीवनसत्वे असतात. (Vitamins)

४)_________ , ________ आणि ________ यांत
मेद असते. (Fats)

प्रश्न ८

अ) खालील उताऱ्याचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर करा ५

One day my father got a new puppy for us. We named him Speedy. Speedy loved to play with anything that he found. He would chew on dad's shoes, mom's purse or even a piece of newspaper. One time Speedy grabbed the shoes again. My dad said "NO Speedy, NO. Not again." Speedy just barked and ran.

प्रश्न ८

ब) खालील उताऱ्याचे मराठीतून इंग्रजीत भाषांतर करा. ५

महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ ला पोरबंदर येथे झाला. भारताला स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. गांधीजी सकाळी लवकर उठत व देवाची प्रार्थना म्हणत. ते स्वतः तयार केलेले कपडे वापरत. त्यांना लोक बापूजी आणि राष्ट्रपिता असेही म्हणतात.